# BHIWANDI NIZAMPUR CITY MUNICIPAL CORPORATION, BHIWANDI

## LOCAL BODY TAX DEPARTMENT

## PUBLIC NOTICE

### Applications are invited for the temporary services of Chartered Accountants for carrying out Assessment Procedures of Local Body Tax Department.

Applications from Chartered Accountants for Local Body Tax Assessment, Reassessment, Refunds, Appeal Proceedings, Interpretations of LBT Rules, Assistance in respect of Doubts if any arises from day to day LBT work etc., Assistance to Local Body Tax department in respect of Judicial Proceedings where are invited till 18/02/2017.

| Sr.No. | Particulars | Educational Qualification |
|---|---|---|
| A. | Conducting LBT assessment, LBT Re-assessment, LBT Refund Procedures, LBT Appeal Procedures and other associated assessment related work | Practising Chartered Accountants with having minimum Five years working experience in taxation sector in an industry. |

Interested Chartered Accountants are requested to submit their application from 10/02/2017 to 18/02/2017 ( Except Holidays) to Local Body Tax Department, 3rd Floor , Old Administrative Building, old S.T.Stand , Kap Alley, Bhiwandi-421308 during office hours i.e. ( 10.00 a.m. to 17.45 p.m.) except holidays. Applications are requested to submit their applications and Financial Bid in proper format along with all necessary self attested photocopies of educational qualification, experience as applicable to the post. No application by the post or courier will be accepted. This Public Notice and Terms and Conditions is available on the website of Bhiwandi Nizampur City Municipal Corporation, Bhiwandi ( WWW.bncmc.gov.in). Details of Terms and conditions are kept for perusal for interested, in Local Body Tax Department on the above address from 10/02/2017 to 18/02/2017.

The Commissioner, Bhiwandi Nizampur City Municipal Corporation kept reserved his right to accept any application according to educational qualification, experience and capacity to work for the Local Body Tax, if required applicants will be called for interview. Above services are purely temporary and for limited period. Nobody will be eligible to challenge the decision made by the Municipal Corporation, in any court of Law.

With Approval of
Hon'ble Commissioner

(Deepak D. Kurlekar)
Deputy Commissioner (LBT)
Bhiwandi Nizampur City Mun. Corporation

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.

## स्थानिक संस्था कर विभाग

**स्थानिक स्वराज्य संस्था करासंदर्भात सल्लागार (Practising Chartered Accountant) यांची तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यासाठी अर्ज मागविणेबाबत जाहीर सूचना.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेमध्ये स्थानिक संस्था करा अंतर्गत विवरण पत्रांची छाननी, करनिर्धारण, पुर्ननिर्धारण, परतावा देणे अपिल विषयाचे कामकाज या संदर्भात स्थानिक संस्था कर नियमातील तरतूदींचा अर्थ लावणे कायद्यातील तरतूदींच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या शंकांचे निरसन करणे, न्यायालयीन कामकाज व इतर अनुषंगीककामे पुर्ण करणेसाठी स्थानिक संस्था कर विभागास सहाय्य करणे इत्यादी कामकाजासाठी अनुभवी सनदी लेखापाल (Chartered Accountant) असलेल्या संस्था/व्यक्ती यांचेकडून खालील नमुद केलेल्या अर्हतेनुसार या जाहिर सूचनेव्दारे दि.१८/०२/२०१७ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.

| Sr.No. | Particulars | Educational Qualification |
|---|---|---|
| A. | Conducting LBT assessment, LBT Re-assessment, LBT Refund Procedures, LBT Appeal Procedures and other associated assessment related work | Practising Chartered Accountants with having minimum Five years working experience in taxation sector in an industry. |

सर्व इच्छूक व्यक्ती/संस्था यांचे अर्ज दिनांक १८/०२/२०१७ पर्यंत स्थानिक संस्था कर, ३ रा मजला, जुनी प्रशासकीय इमारत, जुनी एस.टी.स्टॅन्ड, काप आळी, भिवंडी येथे कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.०० ते सायं.५.४५ वा. पर्यंत सुट्टीचे दिवस वगळून) आवक/जावक विभागात स्विकारण्यात येतील. मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारण्यात येणार नाहीत. अर्जा सोबत शैक्षणिक अर्हता, अनुभव ,कामाचा होणारा मोबदला तसेच इत्यादी आवश्यक कागदपत्रांचा स्वप्रमाणीत केलेल्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे अन्यथा असे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच पोस्टाने किंवा कूरीयरने पाठविलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. सदरची जाहिरात व अटी व शर्ती महानगरपालिका संकेतस्थळावर (WWW.bncmc.gov.in) पाहण्यासाठी उपलब्ध आहे. तसेच कामकाजाच्या अटी व शर्ती बाबतची माहिती स्थानिक संस्था कर विभागाच्या वरील नमुद कार्यालयात दिनांक १८/०२/२०१७ पर्यंत इच्छूक व्यक्ती/संस्था यांना पाहणी करीता उपलब्ध करण्यात येतील. त्या अटी/शर्तींचा पूर्ण विचार करुन अर्ज दाखल करावेत.

प्राप्त झालेल्या अर्जातून आवश्यक ती शैक्षणिक अर्हता, कामकाजाचा अनुभव व कार्यक्षमता इत्यादिंचा सारासार विचार करुन आवश्यक असल्यास मुलाखती घेऊन योग्य व्यक्ती/किंवा संस्था यांची आवश्यकतेनुसार

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.**

**स्थानिक संस्था कर विभागासाठी सल्लागार (Practising Chartered Accountant)**

**नियुक्ती बाबतच्या अटी व शर्ती**

१) जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्या कामांसाठी सनदी लेखापाल (C.A.) नियुक्त करावयाचे आहेत. त्या प्रत्येक कामासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांनी, स्वाक्षांकित केलेल्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाची प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. आवश्यकता असल्यास संबंधित सनदी लेखापाल व्यक्ती/संस्था यांना प्रत्यक्ष मुलाखतींसाठी बोलविणेत येईल. त्यावेळी मूळ प्रमाणपत्रांची तपासणी करण्यांत येईल. प्रत्यक्ष मुलाखतीव्दारे नेमणूक करण्याचे सर्व अधिकार महानगरपालिका आयुक्त यांचे असतील.

२) विहित शैक्षणिक अर्हता धारण करणा-या सनदी लेखापाल (C.A.) व्यक्ती /संस्थांनी दिनांक १८/०२/२०१५ पर्यंत जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या वेळेत अर्ज दाखल करावेत.

३) करावयाच्या कामासाठी स्थानिक संस्था कर रक्कमेच्या करनिर्धारण मागणीच्या मर्यादेनुसार सनदी लेखापाल (C.A.) यांनी दर एकाच टक्केवारीत प्रस्तावित करावयाचे आहेत. प्राप्त दरांपैकी सर्वात कमी दराचे सनदी लेखापाल (C.A.) स्वीकारण्यात येतील. तसेच याबाबत सर्व अधिकार मा.आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवलेले आहेत.

| LBT ASSESSED AMOUNT ( INCLUDING INTEREST, PENALTY ETC) | UNIT | Base Rate for LBT Assessment Work at BNCMC | Proposed Combined Rate in % | Whether the rate in % is below the base rate, at par or above |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| Nil | Per Assesses/Period | 250 | -- | -- |
| From Rs.1 to Rs.5,000/- | Per Assesses/Period | 270 | | |
| From Rs.5,001/- to Rs.50,000/- | Per Assesses/Period | 420 | | |
| From Rs.50,001/- to Rs.5,00,000/- | Per Assesses/Period | 1000 | | |
| From Rs.5,00,001/- to Rs.25,00,000/- | Per Assesses/Period | 1130 | | |
| From Rs.25,00,001/- to Rs.50,00,000/- | Per Assesses/Period | 2420 | | |
| From Rs.50,00,001/- to Rs.1,00,00,000/- | Per Assesses/Period | 4170 | | |
| Above Rs.1,00,00,001/- | Per Assesses/Period | 4670 | | |

४) वरील दर हे सर्व कामासाठी एकत्रितपणे निश्चित केलेले असल्याने ज्या सनदी लेखापाल (C.A.) यांचेकडून जाहिरातीमध्ये नमूद केलेले कामासाठी जे काम करुन घेतले जाईल त्या कामासाठी निश्चित केलेल्या रक्कमेनुसार त्यांना मोबदला रक्कम अदा केली जाईल. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची दरवाढ केली जाणार नाही. देयक भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या ध्येय धोरणानुसार देण्यात येईल.

५) सल्ला देण्यासाठी ज्या विवरणपत्राच्या नस्ती संबंधीतांना उपलब्ध करुन देण्यात येतील त्या संदर्भातील कामकाजाच्या नस्ती दिल्यापासून ८ दिवसांच्या आंत करनिर्धारणेचे काम पूर्ण करावे लागेल तसे न केल्यास प्रति दिवस रु.५०/- या प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

६) कोणत्याही परिस्थितीत विवरणपत्राच्या नस्ती कार्यालयाच्या बाहेर नेता येणार नाहीत किंवा त्यांच्या छायांकित प्रती काढून घेता येणार नाही . असे केल्यास त्यांचेवर कायद्यातील विहित तरतूदी प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

७) स्थानिक संस्था कर नियम २०१० चे नियम ५२ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम च्या कलम १५२ (म) मधील तरतूदी प्रमाणे सल्लागार यांना दिलेल्या कामाची कोणतीही माहिती अन्य व्यक्तीस/संस्थेस उघड करणार नाही असे हमीपत्र द्यावे लागेल.

८) वरील कामासाठी निश्चित केलेली शैक्षणिक अर्हता असलेल्या उमेदवारांनी प्रस्तृत कामाकाजासाठी Joint Venture करता येणार नाही.

९) निवड झाल्यास आपणांस नियुक्तीचे पत्र देण्यात येईल. सुरुवातीची नेमणूक जुन, २०१७ पर्यंत असेल.

१०) प्रस्तृत कामामध्ये विवरणपत्रांची छाननी करणे, र्निधारण करणे, पुर्नर्निधरणा करणे, पुर्नर्निधारणा मध्ये दुरुस्ती करणे, अपील प्राप्त झाल्यास त्याची छाननी करणे, त्या संदर्भातील सल्ला देणे, स्थानिक संस्था कर विवरणपत्रधारकांना परतावा मागितला असल्यास, दिलेल्या परतावा योग्य आहे किंवा नाही याबाबत अभिप्राय देणे इत्यादी व त्या अनुषंगाने येणारी इतर सर्व कामे अंतर्भुत आहेत.

११) संबंधीत सल्लागार यांना द्यावयाच्या सल्लागार फी मधून शासनाचे दराप्रमाणे आवश्यक असलेले सर्व कर व दर यांची कपात करुन घेण्यांत येईल.

१२) सेवा उपलब्ध करण्यासाठी केलेली नियुक्ती पूर्णपणे तात्पुरत्या स्वरुपाची असून कोणत्याही वेळी सल्ला देण्याबाबतची सेवा खंडीत करण्याचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत. त्याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण देणे महानगरपालिकेवर बंधनकारक असणार नाही.

१३) सल्लागार त्यांचे मदतीसाठी त्यांचे कर्मचारी नियुक्त करु शकतील. मात्र त्यापूर्वी अशी नेमणूक करण्यासाठी स्थानिक संस्था कर विभागाकडील उपायुक्त (स्थानिक संस्था कर) यांची पूर्व मान्यता घेणे बंधनकारक असेल. सदर कर्मचा-यांनाही स्थानिक संस्था कर कार्यालयातच मुद्दा क्रमांक ७ मध्ये नमूद केल्यानूसार प्रतिज्ञापत्र देऊन कामकाज करावे लागेल.

१४) सल्लागार यांना नेमून दिलेल्या कामकाजा संदर्भात सल्ला देणे मर्यादित राहील. मात्र दिलेल्या निर्णयावर अंतिम निर्णय घ्यावयाचा अधिकार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व स्थानिक संस्था कर नियम २०१० मधील तरतूदींप्रमाणे महानगरपालिकेस असतील.

१५) सल्लागार यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व स्थानिक संस्था कर नियम २०१० मधील तरतुदींनुसार वरील दिलेल्या कामकाजासाठी कायद्याशी विसंगत सल्ला देता येणार नाही. अशी बाब निदर्शनास आल्यास संबंधीत सल्लागार यांचेवर कायदेशिर कार्यवाही करणे संदर्भात महानगरपालिका उप-आयुक्त(स्थानिक संस्था कर) यांचा निर्णय अंतिम असेल.

१६) यासाठी नियुक्त केलेल्या सल्लागारांची संख्या निश्चित करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त यांचे असतील.

१७) या संदर्भातील कोणताही वाद निर्माण झाल्यास महानगरपालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील व सदरचा निर्णय दोन्ही पक्षांवर बंधनकारक राहील.

१८) सनदी लेखापाल (C.A.) यांना अदा / देय ठरणारी मोबदला रक्कम ही सर्व करा सहीत (सर्व्हीस टॅक्ससह) असेल.

१९) नेमणूक केलेल्या सल्लागारांकडे महानगरपालिका हद्दीतील ज्या व्यापा-यांचे कोणतेही कर विषयक कामकाज असेल त्याची यादी अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील. तसेच असे नसल्यास त्याबाबतचे हमीपात्र द्यावे लागेल.

२०) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेत सेवा उपलब्ध करुन घेतल्यावर, त्या सल्लागार व्यक्ती/संस्था यांना स्थानिक संस्था कर विभागाकडे नोंदणी केलेल्या व्यापा-यांचे स्थानिक संस्था कर संदर्भातील कामकाज करता येणार नाही. सेवा संपुष्टात आल्यावर भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रात तीन वर्ष एल.बी.टी. विषयक काम करदात्याच्या वतीने घेता येणार नाही.

२१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने काम करतांना Professional Ethics चे भान असणे आवश्यक आहे. तसेच Conflict Of Interest सुध्दा नसावेत.

२२) दायित्व निर्वाहन असमाधानकारक असल्यास सदरची नियुक्ती कुठलेही कारण न देता तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल.

२३) वरील सर्व अटी मान्य असल्याबाबत व त्याप्रमाणे कामकाज करण्याची तयारी असल्यास संबंधीतांनी अर्ज करावेत. अर्ज दाखल केल्यानंतर या संदर्भातील कोणतीही तक्रार महानगरपालिकेकडून विचारात घेतली जाणार नाही.

मा.आयुक्त सो.
यांच्या मान्यतेने

(दिपक दे. कुरळेकर)
उप-आयुक्त (स्था.सं.कर)
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

## Application format ( to be submitted on Letter Head )
## For temporary appointment of Practising Chartered Accountant for conducting LBT Assessment at Bhiwandi Nizampur City Municipal Corporation.

**Name and Full Address (with Pincode) of the Chartered Accountant/ Firm** :-……………………………………………………..

**Contact Details (Landline)** :-…………………………………………………..

**(Mobile)** …………………………………………………..

**(Email)** …………………………………………………..

**Membership No.** :- …………………………………………………..

**Firm Registration No.** :-…………………………………………………..

**Qualification** :-…………………………………………………..

…………………………………………………..

**Experience** :-…………………………………………………..

…………………………………………………..

I/We the above name have read the terms and conditions laid down in brief with respect to temporary appointment of Chartered Accountant for conducting LBT assessment Procedures and do hereby agree to the said terms and conditions.

I/We hereby quote the rates below for the LBT assessment procedures as laid down in brief in public notice dated ……/……./2016

| LBT ASSESSED AMOUNT ( INCLUDING INTEREST, PENALTY ETC) | UNIT | Base RATE (Rs.) | Proposed Combined Rate in % | Whether the rate in % is below the base rate, at par or above |
|---|---|---|---|---|
| From Rs.1 to Rs.5,000/- | Per Assesses/Period | 270 | | |
| From Rs.5,001/- to Rs.50,000/- | Per Assesses/Period | 420 | | |
| From Rs.50,001/- to Rs.5,00,000/- | Per Assesses/Period | 1000 | | |
| From Rs.5,00,001/- to Rs.25,00,000/- | Per Assesses/Period | 1130 | | |
| From Rs.25,00,001/- to Rs.50,00,000/- | Per Assesses/Period | 2420 | | |
| From Rs.50,00,001/- to Rs.1,00,00,000/- | Per Assesses/Period | 4170 | | |
| Above Rs.1,00,00,001/- | Per Assesses/Period | 4670 | | |

Also Find attach scan copy of Educational qualifications, Experience details, copy of membership No. and Firm Registration No. issued by The Institute of Chartered Accountants of India,New Delhi.

**Signature/-**
**(Name and Designation of Chartered Accountant)**